स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी साठी
सादर करावयाच्या नियोजित शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधकाचे नाव :- प्रा. कोकाटे भगवान बलभिम

मोबाईल नंबर :- 8805969645

‡-´Ö»Ö †ÖµÖ›üß. :- jaypalkokate@gmail.com

प्रवर्ग :- NT

मार्गदर्शकाचे नाव :- प्रा. डॉ. शिंदे बालाजी किशनराव

मोबाईल नंबर :- 9422879474

‡-´Ö»Ö †ÖµÖ›üß. :- shindebalaji142@gmail.com

विषयाचे नाव :- †£Ö¿ÖÖÃ¡Ö

संशोधन विषयाचे शिर्षक :-

“लातूर जिल्ह्यातील धनगर समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास”

(कालखंड २००४ ते २०१४)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र ×¾ÖÂµÖÖŸÖß»Ö ¯Öß‹“Ö.›ß. ¯Ö¤¾Öß ÃÖÖšß ÃÖÖ¤¸
करावयाच्या नियोजित शोधप्रबंधाचा आराखडा

-: संशोधनाचा विषय :-

“लातूर जिल्ह्यातील धनगर समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास”

(कालखंड 2004 ŸÖê 2014)

-: संशोधक :-

प्रा. कोकाटे भगवान बलभीम
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
संभाजी कॉलेज मुरूड, ता.जि.लातूर

-: मार्गदर्शक :-

प्रा. डॉ. शिंदे बालाजी किशनराव
अर्थशास्त्र विभाग
–ाानोपासक महाविद्यालय, जिंतूर, जि. परभणी

-: संशोधन केंद्र :-

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

±ú²Ö¾ÖÖ¸üß - 2016

“लातूर जिल्ह्यातील धनगर समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास”

(कालखंड २००४ ते २०१४)

प्रस्तावना

भारत हा देश विविधतेत एकतेने नटलेला एक महान देश आहे. या देशात अनेक जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने एकत्र राहतात. प्रत्येक जाती-धर्माची व्यावसायीक, आर्थिक, ¬Ö्ार्मिक, सामाजिक व राजकीय बाजू भिÅ आहेत. महाराष्ट्रात आदिम काळापासून जाती-•Ö´ÖÖÝÖß“µÖÖ वैशिष्टयानुसार पारंपारिक लोकजीवन चालत आलेले आहेत. या अनुशंगाने जाती •Ö´ÖÖÝÖß“Ö आर्थिक व सामाजिक स्थितीचे संशोधन केल्याशिवाय महाराष्ट्रातील जाती-•Ö´ÖÖÝÖß“Öß आर्थिक व सामाजिक वास्तव चेहरा समोर येऊ शकत नाही. जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरण यांचा परिणाम विविध जाती-•ÖÖ´ÖÖÝÖß“µÖÖ ¯ÖÖ¸ü¯Ö्ारिक व्यवसायावर –ााल्याचे दिसून येते. वेगवेगळ्या जाती-•Ö´ÖÖÝÖß“Ö पारंपारिक व्यवसाय काळाच्या ¯Ö›üªÖ†Ö›ü »ÖÖ¯Ö ¯ÖÖ¾ÖÝÖ चाललेले आहेत. त्यांना पुन्हा नव्याने उभा करून जाती-जमातीमधील आर्थिक व सामाजिक ÛÃथतीचा अनुशेष भरून काढण्यासाठी जाती-जमातीच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक स्थितीचा अभ्यास करणे, मुल्यमापन करणे ही काळाची गरज आहे.

महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या जवळपास आकरा कोटीच्या वर आÆê. ´ÖÆÖ¸üÖÂ™ü ¸üÖ•µÖÖÝÖ एक कोटी पंधरा लाखावर धनगर समाजाची लोकसंख्या आहे. आदीम काळापासून मेंढपाळ व पशुपालन हा पारंपारिक व्यवसाय करणारी धनगर ही एक प्रमुख भटकी जमात आहे. आर्थिक विकासाच्या रानटी, गुराखी, शेतकरी व व्यापारी अवस्थेत धनगर हे मुळ निवासी भटकी जमात आहे. धनगर समाजामध्ये अनेक पोट जाती असून प्रत्येकाची देव, देवता भिन्न आहेत, त्यांची उपासना पद्धती, नवस, सायस, ¾ÖÏ¢Ö, सण, उत्सव, जत्रा, चालीरिती, रूढीप्रथा, धार्मिक श्रद्धास्थाने स्वतंत्र आहेत. आज धनगर जमात आपला पारंपारिक मेंढपाळ व्यवसाय राणा-वनात हिंडुन आपल्या घरापासून दूर जावून करत आहेत. ते भटके जीवन जगत आहेत, अशा भटक्या धनगर जमातीचा आर्थिक व सामाजिक स्थितीचा आढावा घेणे सद्यस्थितीत गरजेचे †ÖÆê.

धनगर ही प्रमुख भटकी जमात असल्याने त्यांना सतत भटकत फिरावे लागते. ऋतूनुसार त्यांना †Ö¯Ö»Ö प्रवास बदलावा लागतो. त्यामुळे या जमातील मुले-मुली शिक्षणापासून वंचित राहत आहेत. यासाठी देखील धनगर जमातीच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या संशोधन करणे गरजेचे आहे. राणा-वनातून, दऱ्या खोऱ्यातून फिरून मेंढपाळ व्यवसाय करणे मोठ्या श्रमाचे व कष्टाचे काम आहे. पण आज शारिरीक श्रमाला प्रतिष्ठा राहिलेली नाही. म्हणून या धनगर समाजाचा पारंपारिक व्यवसाय लोप पावत आहे. म्हणून या पारंपारिक व्यवसायाचे पुनर्जीवन करण्यासाठी धनगर जमातीच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे संशोधन करणे अत्यंत आवश्यक आहे.

लातूर जिल्ह्यातील धनगर समाजाच्या मेंढपाळ, शेळीपालन, शेती इत्यादी पारंपारिक व्यावसायासमोर अनेक नैसर्गिक व मानव निर्मित संकटे उभी राहिलेली आहेत. पाणी, रोगराई, वन्यप्राण्यांपासून धोका, चाऱ्याचा प्रश्न, भटक्या लोकांना राहण्याचा प्रश्न, दिवसेंदिवस बिकट चाललेले आहेत, म्हणून या व्यवसायातील लोकांवर बेकारीचे संकट येत आहे, हा ¾µÖ¾ÖÃÖÖµÖ मोडित निघत आहे. हीच स्थिती कायम राहिली तर या लोकांना रोजगार व त्यांच्या इतर ÃÖÖµÖß-सुविधा पुरविण्याची मोठी जबाबदारी भविष्यात सरकारवर पडू शकते, म्हणून या जमातीची आर्थिक आणि सामाजिक स्थितीच्या विविध पैलुंचे सुक्ष्म संशोधन होणे गरजेचे आहे.

लातूर हा मराठवाड्यातील राजकीय, आर्थिक, सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण जिल्हा आहे. लातूर जिल्ह्याला सातत्याने दुष्काळ, भुकंप, नापिकी, पाणीटंचाई इत्यादी नैसर्गिक संकटाला तोंड द्यावे लागत आहे. लातूर जिल्ह्यातील धनगर समाजाची लोकसंख्या लक्षणीय आहे. धनगर समाजाच्या पारंपारिक व्यवसायाला सातत्याने आर्थिक अडचणीला सामोरे जावे लागत आहे. लातूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या जाती-जमातीमधील आर्थिक, सामाजिक व व्यवसायीक समतोल साधायचा असेल तर धनगर जातीच्या आर्थिक प्रश्नावर सखोल चिंतन व संशोधन करून योग्य त्या उपाय योजना सुचविणे गरजेचे आहे, म्हणून प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडला आहे. या संशोधनामुळे धनगर समाजाच्या आर्थिक व सामाजिक प्रश्नावर उपाय योजना होवू शकतील असा मला आशावा¤ †ÖÆê.

संशोधन विषयाची निवड

जागतिक पातळीवर ज्या अनेक समस्या आहेत त्यामध्ये आर्थिक विषमता, बेकारी व दारिद्र्य या समस्या अधिक तीव्रतेने जाणवतात. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये शासनाने धनगर समाजाकडे दुर्लक्ष केल्यामुळे धनगर समाजापुढील आर्थिक प्रश्नाची तीव्रता सातत्याने वाढत चालली आहे. वास्तवीक पाहता आर्थिक विकासाचा वाटा समाजातील सर्व घटकापर्यंत न्याय पद्धतीने पोहचला पाहिजे, या हेतूच्या पुर्ततेसाठी मी संशोधनासाठी हा विषय निवडला आहे.

संशोधनाची गरज व महत्व

देशात उपलब्ध असलेल्या साधन सामुग्रीच्या सहाय्याने निर्माण –ÖÖ»Ö»Ö ¸ÖÂ™ßµÖ ^Ÿ¯Ö®Ö ¤¿ÖÖŸÖß»Ö Ã֋Ö Ã֋´ÖÖ•Ö घटकांन योग्य पद्धतीने वितरीत होणे आवश्यक आहे. पण प्रत्यक्ष ÛÃ£ÖŸÖß वेगळी वाटते म्हणून मला याबाबत संशोधन करणे गरजेचे वाटते.

संशोधनाची व्याप्ती

सदरील संशोधन हे मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यातील धनगर समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्याशी निगडीत आहे. यासाठी सन २००४ ते २०१४ या दशकाची निवड केली आहे.

संशोधनाचे भौगोलिक क्षेत्र

संबधीत संशोधन हे लातूर जिल्ह्याच्या संदर्भात असल्याने संपूर्ण लातूर जिल्हा हे संशोधनाचे कार्यक्षेत्र आहे.

संशोधनाचा कालखंड

प्रस्तूत संशोधनासाठी लातूर जिल्ह्याचे संपूर्ण कार्यक्षेत्र निवडण्यात आले असून त्यासाठी मागील दहा वर्ष (२००४ ते २०१४) हा संशोधनाचा कालखंड राहणार आहे.

सदरील संशोधन विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या कालखंडात पूर्ण केले जाईल.

संशोधनाची उद्दिष्ट्ये

1. लातूर जिल्ह्यातील धनगर समाजाच्या बदलत चाललेल्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
2. लातूर जिल्ह्यातील धनगर समाजाच्या सन २००४ ते २०१४ या कालखंडातील आर्थिक व सामाजिक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास करणे.
3. लातूर जिल्ह्यातील धनगर समाजाच्या पारंपारिक व्यवसायÖÖŸÖß»Ö ÃÖ´ÖÃµÖÖ“ÖÖ †³µÖÖÃÖ करणे.
4. धनगर समाजाच्या पारंपारिक व्यवसायावर होणाऱ्या सामाजिक व आर्थिक परिणामांचा अभ्यास करणे.
5. लातूर जिल्ह्यातील धनगर समाजाच्या आर्थिक व सामाजिक समस्या सोडविण्यासाठी ÃÖरकारने केलेल्या विविध उपाय योजनांचा आढावा घेणे.
6. धनगर या भटक्या जमातीच्या आर्थिक आणि सामाजिक समस्याला कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचे अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून विश्लेषण करणे.
7. धनगर जातीच्या पारंपारिक व्यवसायापुढील समस्या अभ्यासणे व त्यावर उपाय सुचवीणे.

संशोधनाची गृहितके

1. लातूर जिल्ह्यातील धनगर समाजाची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस खालावत चालली †ÖÆê.
2. लातूर जिल्ह्यातील धनगर समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीस नैसर्गिक आपत्ती काही अंशी कारणीभूत आहे.
3. शासनाने धनगर समाजाच्या प्रगतीसाठी केलेले ˆ¯ÖÖµÖ ŸÖ™üÖ•Ö †ÖÆêŸÖ.
4. धनगर समाजाला आर्थिक विकासाचा योग्य वाटा न मिळाल्यामुळे त्याचे सामाजिक व आर्थिक गंभीर परिणाम पाहावयास ×´ÖôûŸÖÖŸÖ.
5. धनगर समाजाच्या परंपरागत व्यवसायावर नैसर्गिक आपत्तीचा व राजकीय स्थितीचा परिणाम दिसून येतो.

संशोधन पद्धती

सदरील संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीयक सामुग्रीचा वापर करण्यात येणार असून प्राथमिक माहिती सामुग्री संग्रहन पद्धतीने केली जाईल. प्रस्तूत संशोधनासाठी जिल्ह्याची निवड करण्यात आलेली आहे. लातूर जिल्ह्यात १० तालुके असून प्रत्येक तालुक्यातील तीन गावाची निवड नमुना पद्धतीने करून एकूण ३० गावे निवडली जातील. प्रत्येक गावातील १० कुटुंबचा असे एकूण ३०० कुटुंबाचा आर्थिक व सामाजिक स्थितीशी निगडीत माहितीचे प्रश्नावलीद्वÖ¸ü संकलन करण्यात येईल. या संशोधनातून धनगर समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा नमुना पद्धतीने अभ्यास करून निष्कर्ष काढले जाणार आहेत.

द्वितीय माहिती साधणे

द्वितीयक माहिती साधनसामुग्रीमध्ये महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, लातूर, विविध मासिके, सरकारी अहवाल, सर्वेक्षण, सरकारी कार्यालयातील उपलब्ध माहिती, प्रबंध, वार्षिक अहवाल, इंटरनेट सेवा इत्यादी साधनाचा आधार घेवून माहिती संकलित करून सदरील संशोधन पूर्ण केले जाणार आहे.

संशोधन मर्यादा

सदरील संशोधन करताना खालील मर्यादा येवू शकतात.

1. सदरील संशोधन लातूर जिल्ह्यापुरते मर्यादित राहील.
2. सदरील संशोधनात मागील दहा वर्षाचा धनगर समाजातील सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यात येइल.
3. धनगर ही एक प्रमुख भटकी जमात असून या समाजामधील शिक्षणाचे प्रमाण फारच कमी´ÖÆü †ÃÖ»µÖÖ´ÖôÖê Ÿµ ÖÖतील बरीच कुटुंबे निरक्षर असण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांच्याकडून अचुक माहिती मिळेलच असे नाही.

प्रकरण विभागणी

सदरील संशोधन करत असताना योग्य व सुसंगत संशोधन व्हावे यासाठी प्रत्येक घटकाचा सखोल अभ्यास व्हावा म्हणून संशोधन विषयाची खालील प्रकरणामध्ये विभागणी केली जात †ÖÆê.

प्रकरण १ ले - प्रस्तावना व धनगर समाजाची पार्श्वभूमी

सदरील प्रकरणात संशोधनासाठी निवडलेल्या विषयाच्या अनुषंगाने भटक्या जाती-जमातीचा अर्थ, पार्श्वभूमी व भारतातील धनगर जमातीच्या बदलत्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा ऐतिहासिक आढावा घेण्यात येईल.

प्रकरण २ रे - संशोधन पद्धती व संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन

प्रस्तूत प्रकरणात संशोधनासाठी उपलब्ध साहित्याचे सिंहावलोकन करण्यात येईल, यासाठी प्राथमिक व द्वितीयक सामुग्री संग्रहन, विश्लेषण व तुलना करण्यात येईल.

प्रकरण ३ रे - »ÖÖŸÖ¸ü ×•Ö»ÊÖ“ÖÖß ¯ÖÖÀ¾Ö³Ö´ÖÖß

लातूर जिल्ह्याचा पूर्व इतिहास, निर्मिती, भौगोलिक परिस्थिती, जाती-जमातीचे तालुका निहाय वितरण, आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, पर्यावरणीय संरचनेचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण ४ थे - लातूर जिल्ह्यातील धनगर समाजाची आर्थिक व सामाजिक स्थिती

सदरील प्रकरणात लातूर जिल्ह्यातील मागील दहा वर्षात धनगर समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीतील बदलाचा अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून विश्लेषणात्मक व तुलनात्मक आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण ५ वे - निष्कर्ष, शिफारशी व उपाययोजना

प्रस्तूत संशोधनातून धनगर समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थिती संदर्भात विविध निष्कर्ष काढले जातील व ही स्थिती सुधारण्यासाठी विविध शिफारशी व उपाय योजना सुचविण्यात येतील.

संदर्भग्रंथ सूची

1. कोळेकर, गणपतराव - धनगर समाजाचे गोत्रे
   प्रकाशक-ल.ना. श्रीगीरे
   (संपादक-ÃÖÖ.´Ö×Æ»ÖÖ ÃÖ¤ü¿Ö ÃÖÖ»ÖÖ¯Ö¸ü)
2. •Ö´ÖÖ¤Ö¸ü ²ÖÖ. ‹. - धनगर समाजाची प्राचीनता
3. बनसुडे गुंडेराव - अखिल भारतीय धनगर समाज महासंघ
4. बुचडे शं. ना. - धनगर जाती परिचय
5. तमकर, प्रा. गणेश - धनगर व धनगर समाज
6. मल्होत्रा, डॉ. के. सी. - धनगर समाजाच्या पोट जातीचे विश्लेषण
   दैनिक मतदार यवतमाळ, दि. ३ सप्टें. १९८९
7. कोकरे संजय धातू - (संपा) इतिहास धनगरांचा
   धनगर युवक संघटना प्रकाशन, मुंबई, प्रथम †Ö¾Öé¢ÖßÖ
8. लोही, प्रा. म. ना. - धनगर समाज काल आणि आज

महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००४ ते २०१४

´ÖÆÖ¸üÖÂ™ü ¸üÖ•µÖ

संशोधक
प्रा. कोकाटे भगवान बलभिम
अर्थशास्त्र विभाग
ÃÖ³ÖÖ•ÖßÖ ´ÖÆÖ×¾ÖªÖ»ÖµÖ, ´ÖÖÓ›üß
ŸÖÖ.×•Ö. »ÖÖŸÖæ¸ü

मार्गदर्शक
¯ÖÖ. ›üÖ. Ø¿ÖÖ¤ü ²ÖÖ»ÖÖ•ÖÖ किशनराव
संशोधन मार्गदर्शक (अर्थशास्त्र)
ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर
जि. परभणी